**कृपया प्रसिध्दीसाठी** **19 जानेवारी, 2010**

# मनोरी खाडीवरील पुल बांधण्यासाठी पर्यावरण मंत्रालयाची परवानगी नाही

***राम नाईक यांचा गौप्यस्फोट***

**मुंबई, मंगळवार :** केंद्रिय पर्यावरण खात्याचे सर्व नियम धाब्यावर बसवून केंद्र सरकारची परवानगी न मिळविताच एमएमआरडीए मनोरी खाडीवर पूल बांधायला निघाले आहे, अशी धक्कादायक माहिती माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

मनोरी, गोराईतील नागरिकांचा विरोध असताना समृध्द खारफुटीच्या क्षेत्रामध्ये 'वाहतुक सुविधे' चे खोटे कारण दाखवून बड्या धनदांडग्यांच्या लाभांसाठी 200 कोटी रुपयांचा पूल मार्वे - मनोरी खाडीवर बांधण्याचा घाट एमएमआरडीएने घातला आहे. नोव्हेंबर 2009 मध्ये त्यासाठी निविदाही मागविल्या. त्यानंतर 'सीआरझेड' क्षेत्रामध्ये जिथे मोठ्या प्रमाणावर खारफुटी आहे, जवळच देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे नौदलाचे 'आयएनएस हमला' व लष्कराचे 'हेवी ब्रीज ट्रेनिंग सेंटर' आहे तिथे पूलाची कोणतीही आवश्यकता नाही इतकेच नव्हे तर स्थानिक मच्छीमार व शेतकरी यांचा पूल उभारण्यास विरोध आहे. त्यामुळे हा पूल होवू नये असे श्री.राम नाईक यांनी सांगितले होते. सीआरझेड क्षेत्रात हा पूल बांधण्यास केंद्रिय पर्यावरण खात्याने परवानगी कशी काय दिली, अशी चौकशी करणारे पत्रही श्री.नाईक यांनी 19 नोव्हेंबर 2009 रोजी केंद्रिय पर्यावरण व वन राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. जयराम रमेश यांनी लिहीले होते. या पत्राला श्री.जयराम रमेश यांनी 14 जानेवारी 2010 रोजी उत्तर पाठविले असून मनोरी खाडीवर पूल बांधण्यासाठी सीआरझेड अंतर्गत अनुमति मागणारा कोणताही प्रस्ताव महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे पाठवलाच नसल्याची धक्कादायक माहिती त्यामध्ये दिली आहे. संरक्षण मंत्री श्री. ए.के.अँथनी यांनीही या प्रकरणी आपण चौकशी करीत असल्याचे श्री. राम नाईक यांना कळविले आहे.

''पर्यावरण राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री.रमेश यांच्या पत्राचा स्पष्ट अर्थ असा आहे की सर्व कायदे धाब्यावर बसवून एमएमआरडीए हा पूल बांधू पाहात आहे, हे आम्ही खपवून घेणार नाही, '' असा ईशारा श्री. नाईक यांनी दिला आहे. केंद्र सरकारची परवानगी न घेता एमएमआरडीएने हा पूल बांधण्याचा निर्णय कसा घेतला तसेच निविदाही कशी काढली याची चौकशी मुख्यमंत्री श्री.अशेक चव्हाण यांनी करावी अशी मागणीही श्री.राम नाईक यांनी केली आहे.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांचे पत्र**

जयराम रमेश
JAIRAM RAMESH

राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार)
पर्यावरण एवं वन
भारत सरकार
नई दिल्ली-110003
MINISTER OF STATE (INDEPENDENT CHARGE)
ENVIRONMENT & FORESTS
GOVERNMENT OF INDIA
NEW DELHI - 110 003

D.O.No.2-15/2009-IA-III/2830

14th January 2010

Dear Shri Ram Naikji -

This has reference to your letter dated 19th November 2009 regarding construction of Cable-stayed Bridge across Manori Creek in Mumbai. It is informed that no such proposal has been received from the Government of Maharashtra for the CRZ clearance.

With regards,

Yours sincerely,

(Jairam Ramesh)

Shri Ram Naik,
Former Petroleum Minister
9, Shivsmriti, 51 Jaiprakash Nagar
Goregaon East
Mumbai 400 063